# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

तार - EDUTECH E-mail :- desk12@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : १२/आस्था/बदल्या/ग्रंथपाल/२०१०/२९३२

दिनांक : ३१/५/२०१०

**पहा : सन् २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, दि. १२ मे, २००६**

संदर्भिय शासन अधिनियमातील तरतूदीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे त्यांना प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन या संचालनालयाच्या अधिनस्त संस्था कार्यालयातील **ग्रंथपाल (राज्यस्तरीय)** पदांवर कार्यरत असलेल्या खालील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्याच क्षमतेत विनंती / प्रशासकीय कारणास्तव बदल्या करीत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदलीनंतरचे ठिकाण | बदलीचे कारण |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती बी.एम. परदेशी<br>ग्रंथपाल,<br>शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड येथे रिक्त असलेल्या ग्रंथपाल पदावर | **विनंती बदली** |
| २. | श्री. ए.बी. तोंडारे,<br>ग्रंथपाल,<br>शासकीय नि. महिला तंत्रनिकेतन, लातूर | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे श्री. व्ही. व्ही. घोलप, ग्रंथपाल यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या ग्रंथपाल पदावर | **प्रशासकीय बदली** |
| ३. | श्री. व्ही. व्ही. घोलप,<br>ग्रंथपाल,<br>शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे श्री. ए. बी. तोंडारे, ग्रंथपाल यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या ग्रंथपाल पदावर | **प्रशासकीय बदली** |

उपरोक्त कर्मचाऱ्यांनी बदली करण्यांत आलेल्या संस्थेत / कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचाऱ्यांची बदली त्यांच्या विनंतीवरुन करण्यांत आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहाणार नाही. तसेच ज्या कर्मचाऱ्यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियमानुसार प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

**( डॉ. सु. का. महाजन )**

प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जालना / उस्मानाबाद / लातूर. **(मानार्थ)**

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक / औरंगाबाद.

**त्यांना कळविण्यांत येते की, सदर बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन एकत्रित अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा.**

३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड / जळगांव / उस्मानाबाद.

४. शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर.

**वरील अ. क्र. ३ व ४ यांना कळविण्यांत येते की, संबंधित कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यांत यावे / बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यांत यावे.**

५. संबंधित कर्मचारी. **(संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत)**

६. कार्यासन क्र. १६, मुख्य कार्यालय, मुंबई.

७. कार्यासन क्र. १२, मुख्य कार्यालय, मुंबई **(निवड नस्ती)**